# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो -३ मार्ग

मेट्रो-३ चा सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल पर्यंत भुयारीकरणाचा २८वा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

**मुंबई, दि ३० एप्रिल २०२०** - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) द्वारे भुयारीकरणाचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रल पर्यंतचा महत्त्वाचा २८वा टप्पा आज पार पडला. एकाच टप्प्यात सलग ४ किमी अंतराचे भुयारीकरण करणारे वैतरणा -२ हे मेट्रो-३ चे पहिले टीबीएम ठरले.

पॅकेज २ च्या वैतरणा २ या टीबीएमद्वारे भुयारीकरणास फेब्रुवारी २०१८ मध्ये सीएसएमटी लॉंचिंग शाफ्ट येथून सुरुवात झाली होती. एकूण २७३० काँक्रिट रिंग्स चा वापर करत मेट्रो ३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रल पर्यंतचे सर्वात जास्त अंतराचा पल्ला वैतरणा २ टीबीएम ने गाठला.

यावर प्रतिक्रिया देताना मेट्रो ३ मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजीत सिंह देओल म्हणाले, पॅकेज २ अंतर्गत येणारा भाग हा समुद्र किनाऱ्याला समांतर होता तसेच यामार्गावर अनेक जीर्ण व जुन्या इमारतींचा समावेश आहे शिवाय या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी १-४ मीटर इतक्या जवळ अंतरावर होती त्यामुळे मार्गिकेतील भुयारीकरणाचा हा टप्पा सर्वात आव्हानात्मक होता.

शिवाय कोविड-१९ च्या साथीमुळे हे काम अधिकच आव्हानात्मक झाले होते मात्र राज्य शासनाच्या सर्व मार्गदर्शन सूचनांचे कठोर पालन करून शारीरिक अंतर (physical distancing) ठेवत हे काम पूर्ण केले, असेही श्री. देओल म्हणाले.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रल दरम्यान ४ किमी भुयारीकरणाअंतर्गत सीएसएमटी, काळबादेवी, गिरगाव, ग्रांट रॉड व मुंबई सेंट्रल या पाच भूमिगत स्थानकांचा समावेश आहे.

For further media queries please contact:-

**Parihas Hate**
**+91 9819091066** parihas.hate@perceptindia.in

**Avik Nag**
**+91 8961548164** avik.nag@perceptindia.in